# जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर भरती प्रक्रिया–२०२३

## "लघुलेखक (ग्रेड–३)" पदाचे उमेदवारांना सुचना

संदर्भ :– मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. ब(जन)–५६०१/५७/२०२४/१५८०,
दिनांक २८ ऑगस्ट, २०२४.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ब(जन)–५६०१/५७/२०२४/१५८०, दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार लघुलेखक ग्रेड–३ या पदाकरीता मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आज दिनांक १०/०९/२०२४ ला जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहु पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक १८/०९/२०२४, १९/०९/२०२४ व २०/०९/२०२४ ला जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे खालील वेळापत्रकानुसार घेण्यात येणार आहे.

## प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळापत्रक

| दिनांक | प्रत्यक्ष मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या यादीतील अनुक्रमांक | एकूण संख्या | दस्तऐवज तपासणी व प्रत्यक्ष मुलाखतीची वेळ |
|---|---|---|---|
| १८/०९/२०२४ | ०१ ते २२ | २२ | सकाळी ०८.०० पासून दस्तऐवज तपासणी व त्यानंतर प्रत्यक्ष मुलाखत |
| १९/०९/२०२४ | २३ ते ४४ | २२ | |
| २०/०९/२०२४ | ४५ ते ६७ | २३ | |

टिप :– उपरोक्त वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

मुलाखतीकरिता बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीकरीता येतांना खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती व अर्ज केलेल्या पदानुसार त्यांच्या मुळ प्रती पडताळणीच्या उद्देशाने जिल्हा न्यायालयाच्या प्रबंधकाकडे सादर करावे. सदर उमेदवारांनी दस्तऐवज तपासणी वेळेपूर्वी अर्धा तास आधी उपस्थित राहावे. दस्तऐवज तपासणी सुरू झाल्यानंतर उशीराने आलेल्या उमेदवारांना मुलाखतीकरीता प्रवेश दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर प्रत्यक्ष मुलाखतीकरीता येतांना आपणास निर्गमित केलेले प्रवेश पत्र (Hall Ticket) सोबत आणणे अनिवार्य आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी उमेदवारांना दिलेल्या दिनांक ०४/१२/२०२३ च्या जाहिरातीमधील सुचनेतील परिच्छेद क्रमांक ५ (ग) मध्ये नमुद केल्याप्रमाणे खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती व अर्ज केलेल्या पदानुसार त्यांचे मुळ प्रती पडताळणीच्या उद्देशाने मुलाखतीच्या वेळेस सोबत आणावे.

१) जन्मतारखेचा दाखला किंवा पूरावा (शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला/माध्यमिक शाळा प्रमाणपत्र)

२) अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३) अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा मध्ये मिळवलेल्या गुणांची गुणपत्रिका.

४) दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेली चारित्र्य प्रमाणपत्रे, त्यांचे नांव, पदनाम आणि पूर्णटपाल पत्यासह, जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस किंवा नंतर दिलेले, उमेदवाराचे नैतिक चारित्र्य चांगले असल्याचे प्रमाणित करणारे, जाहिरातीबरोबर दिलेल्या विहीत नमुण्यात.

५) पात्रतेच्या निकषात नमुद केल्याप्रमाणे विद्यापीठ/संस्थेने जारी केलेले संगणक संचालनातील विहीत ज्ञानाविषयीचे प्रमाणपत्र.

६) पात्रता निकषात नमुद केल्याप्रमाणे शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र राज्य किंवा शासकीय मंडळ किंवा आय.टी.आय. ने जारी केलेले इंग्रजी व मराठी शॉर्टहॅंड/टायपिंगमधील आवश्यक गतीचे प्रमाणपत्र.

७) शासनाने विहित केलेल्या प्राधिका—याकडून निर्गमित केलेला जातीचा दाखला, जिथे लागू असेल तेथे.

८) उमेदवार राज्य/केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधीत विभागाकडून ''नाहरकत प्रमाणपत्र''.

९) अनुभव प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे, असल्यास.

१०) विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदललेले असेल तर तिचे नाव बदलण्या संदर्भातील कागदपत्रे, जसे की शासकीय राजपत्र/सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

११) इतर कोणतीही कागदपत्रे, जर जिल्हा न्यायालय आस्थापनेने मागितल्यास.

10/9/24

दिनांक : १०/०९/२०२४

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
चंद्रपूर.